
• वर्ष : ०३ • अंक : २०६ • पुणे • गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





बुवाबाजी आणि अंधश्रद्धेतून बाहेर आलं पाहिजे 3



ऑपरेशन हिमसेतू अंतर्गत पर्यटकांची केली सुटका 4

## ठळक बातम्या

### विधान परिषदेच्या १७ जागांचा बिगुल

मुंबई (आरंभ पर्व) : महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठी हालचाल सुरू झाली असून, विधान परिषदेच्या 17 जागांसाठी निवडणुकीचा मार्ग मोकळा होत असल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या अडीच वर्षांपासून रिक्त असलेल्या या जागा भरण्यासाठी प्रक्रिया गतीमान झाली आहे. यासोबतच, विधान परिषदेतील 9 सदस्यांचा कार्यकाळ 13 मे रोजी संपणार असल्याने त्या जागांसाठीही पुढील आठवड्यात निवडणूक जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

### 'छत्रपती' गीत प्रेक्षकांच्या भेटीला

मुंबई (आरंभ पर्व) : 'जिओ स्टुडिओज्' आणि 'मुंबई फिल्म कंपनी' यांच्या संयुक्त विद्यमाने साकार होणाऱ्या बहुप्रतिक्षित 'राजा शिवाजी' या ऐतिहासिक चित्रपटाचे पहिले गाणे, राजा शिवाजी अँथम 'छत्रपती', आज अधिकृतरीत्या प्रदर्शित झाले आहे. भारतीय इतिहासाचा तेजस्वी वारसा, छत्रपती शिवाजी महाराजांचा अतुलनीय पराक्रम आणि हिंदवी स्वराज्याचा स्वाभिमान यांना समर्पित असलेले हे गीत म्हणजे केवळ संगीत नसून शौर्य आणि अभिमानाचा एक भव्य संगम आहे. 'देश म्युझिक' आणि 'वॉर्नर म्युझिक इंडिया'च्या माध्यमातून समोर आलेले हे गीत प्रेक्षकांना एका अद्वितीय आणि भावपूर्ण संगीतमय अनुभवाची प्रचिती करून देत असून, या गाण्याने शिवप्रेमींमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण केली आहे.

### ठोस उपाययोजना करण्याचे निर्देश

मुंबई (आरंभ पर्व) : सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) आर्थिक कामगिरीबाबत परिवहन मंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट भूमिका मांडत तोटा कमी करण्यासाठी सर्वंकष उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले आहेत. ते एसटी महामंडळाच्या मुख्यालयात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत बोलत होते. या बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर व सर्व खाते प्रमुख उपस्थित होते. या आर्थिक वर्षात एसटीचे एकूण चालनीय उत्पन्न ११,४७५ कोटी रुपये इतके नोंदविण्यात आले, तर खर्च १२,०६६ कोटी रुपये झाला. परिणामी महामंडळाला ५९१ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला.

### महापालिकेतच चोरी


मुंबई (आरंभ पर्व) : शहरातील सार्वजनिक ठिकाणी चोरीच्या घटना वारंवार घडत असताना आता थेट मुंबई महापालिकेच्या इमारतीतच चोरी झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. महापालिकेच्या स्थायी समिती सभागृहात एका नगरसेविकेच्या पर्समधून 20 हजार रुपये चोरीला गेल्याने प्रशासन आणि राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. ही घटना वार्ड क्रमांक 56 मधील ठाकरेंच्या शिवसेनेच्या नगरसेविका लक्ष्मी भाटिया यांच्या बाबतीत घडली आहे. त्या स्थायी समितीच्या सदस्यही आहेत.

# भोंदू खरातचा अंक खेळ उघड

## कार नंबरपासून साम्राज्यापर्यंत ९ चा प्रभाव; अंकशास्त्राच्या नावाखाली फसवणूक

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

भोंदूगिरी आणि अंकशास्त्राच्या नावाखाली लोकांना फसवणाऱ्या अशोक खरातच्या कारनाम्यांमुळे राज्यभरात खळबळ उडाली आहे. अंकशास्त्राचा मोठा गाजावाजा करणारा खरात स्वतःसाठी 9 हा अंक अत्यंत शुभ मानत होता. त्यामुळेच त्याने आपल्या गाड्यांचे नंबरही खास करून असे निवडले, ज्यांची बेरीज 9 येईल. तपासादरम्यान ही बाब समोर आल्यानंतर त्याच्या अंधश्रद्धेच्या खेळाचा आणखी एक पैलू उघड झाला आहे. तपास यंत्रणांच्या चौकशीत असे समोर आले की, खरातने आरटीओमधून चॉइस नंबर घेऊन आपल्या गाड्यांचे क्रमांक निश्चित केले होते. या सर्व नंबरांची बेरीज 9 येईल याची तो विशेष काळजी घेत असे. अंकशास्त्राच्या माध्यमातून लोकांचा विश्वास संपादन करून त्याने अनेकांना जाळ्यात ओढले. मोठमोठ्या नेत्यांपासून



ते सामान्य नागरिकांपर्यंत अनेकांना त्याने आपल्या प्रभावाखाली घेतल्याचे आरोप आहेत. दरम्यान, खरातविरोधात अनेक गंभीर गुन्हे दाखल झाले आहेत. महिलांचे लैंगिक शोषण, फसवणूक आणि अंधश्रद्धा पसरवण्याचे आरोप त्याच्यावर आहेत. एसआयटीच्या तपासानंतर आणि हेल्पलाईन सुरू झाल्यानंतर अनेक महिलांनी व व्यावसायिकांनी त्याच्याविरोधात तक्रारी नोंदवल्या आहेत. त्यामुळे त्याच्या गैरकृत्यांची व्याप्ती किती मोठी होती, याची कल्पना येत आहे. अंकशास्त्रानुसार 9 हा अंक बंधुत्व, समृद्धी, भाग्य आणि मानवतावादी कार्याशी जोडलेला मानला जातो. तसेच मंगळ ग्रहाशी संबंधित असल्याने हा अंक ऊर्जा आणि यशाचे प्रतीक असल्याचे मानले जाते. याच कारणामुळे खरातने 9 या अंकाला विशेष महत्त्व दिले होते. पैसा आणि यश मिळवण्यासाठी हा अंक उपयोगी ठरतो, असा त्याचा विश्वास होता. खरातच्या ताब्यातील इतर वाहनांवरही 9 अंकाचा प्रभाव दिसून आला आहे. उदाहरणार्थ, त्याच्या एका गाडीचा नंबर 6453 असून, त्याची बेरीज 18 होते आणि पुढे 1+8 केल्यास ती 9 येते. यावरून त्याने प्रत्येक गोष्टीत अंकशास्त्राचा वापर करून स्वतःची प्रतिमा निर्माण केली होती. तपास यंत्रणांनी त्याच्या मालमत्तांची तपासणी केल्यानंतर त्याच्या ऐषारामी जीवनशैलीचे अनेक पुरावे समोर आले आहेत.

# सुषमा अंधारेंचे आरोप राजकीय हेतूने प्रेरित : दीपक केसरकर

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

नाशिकच्या भोंदू अशोक खरात प्रकरणावरून महाराष्ट्रात राजकारण चांगलेच तापले असून, आता शिवसेना ठाकरे गट आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात थेट जुंपली आहे. "अशोक खरातचा 'सीडीआर' खरा असेल, तर एसआयटी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दीपक केसरकर यांना चौकशीला कधी बोलावणार?" असा रोखठोक सवाल सुषमा अंधारे यांनी विचारला आहे. यावर प्रत्युत्तर देताना, "केवळ फोटो असणे हा



गुन्हा नाही," असे म्हणत दीपक केसरकर यांनी अंधारेंचे आरोप फेटाळून लावले आहेत. सुषमा अंधारेंचे आरोप हे राजकीय हेतूने असून, त्यांच्या आरोपांना उत्तर देण्याचे मला बंधन नसल्याचे दीपक केसरकर म्हणालेत. शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी आज पत्रकार परिषद घेत गृहखात्यावर प्रश्नांची सरबत्ती केली. खरात प्रकरणातील कथित सीडीआरचा दाखला देत त्या म्हणाल्या की, "अशोक खरातचे जे सीडीआर समोर आले आहेत, ते खरे की खोटे हे स्वतः मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट करावे. जर ते खरे असतील, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री दीपक केसरकर यांना एसआयटी चौकशीसाठी कधी पाचारण करणार? तसेच रुपाली चाकणकर यांना गजाआड कधी केले जाणार? या प्रश्नांची उत्तरे राज्यातील जनतेला मिळाली पाहिजेत," अशी मागणी त्यांनी केली. सुषमा अंधारे यांच्या आरोपांवर बोलताना आमदार दीपक केसरकर यांनी आपली बाजू स्पष्ट केली. "अशोक खरात प्रकरणाची एसआयटी आणि ईडी (ED) या दोन्ही यंत्रणांकडून सखोल चौकशी सुरू आहे. जिथे कोणाची नोंद मिळते, तिथे ही यंत्रणा मोठ्या लोकांनाही चौकशीसाठी बोलावते. पण केवळ कोणाची ओळख असणे, कोणाला भेटणे किंवा फोटो असणे हा गुन्हा ठरू शकत नाही," असे केसरकर यांनी नमूद केले.

# प्रशासकीय फेरबदल

## राज्यात ५ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या; सोलापूर जिल्हा परिषदेसह पर्यटन संचालनालयात खांदेपालट

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

राज्य शासनाने (१५ एप्रिल) प्रशासकीय पातळीवर मोठे फेरबदल करत पाच सनदी अधिकाऱ्यांच्या (IAS) बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. यामध्ये सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबईचे पर्यटन संचालक आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पदांचा समावेश आहे. राज्यातील आयएएस अधिकाऱ्यांच्या बदलीचे सत्र अद्यापही सुरुच आहे. गेल्याच आठवड्यात काही अधिकाऱ्यांची ट्रान्सफर करण्यात आली होती, तत्पूर्वी 25 अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये, काही जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांची बदली झाली, तर काहींना सचिवपदी जबाबदारी मिळाली होती. आज आणखी ५ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.




बदल्यांचे तपशील खालीलप्रमाणे:

१. डॉ. बी. एन. पाटील (IAS: २०१४): मुंबईचे पर्यटन संचालक म्हणून कार्यरत असलेले डॉ. बी. एन. पाटील यांची आता उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई अंतर्गत असलेल्या 'रुसा' (RUSA) प्रकल्पाच्या संचालकपदी बदली करण्यात आली आहे.

२. मंगेश जोशी (IAS: २०१५): पुण्यातील 'यशादा' (YASHADA) येथे उपमहासंचालक म्हणून कार्यरत असलेले मंगेश जोशी यांची वर्णी आता मुंबईचे नवे पर्यटन संचालक म्हणून लागली आहे.

३. कुलदीप जंगम (IAS: २०२०): सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) म्हणून कार्यरत असलेले कुलदीप जंगम यांची बदली पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी करण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवडमधील प्रशासकीय कामांना गती देण्यासाठी हा बदल महत्त्वाचा मानला जात आहे.

४. कुशल जैन (IAS: २०२२): गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी येथे प्रकल्प अधिकारी (ITDP) आणि सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असलेले कुशल जैन यांची पदोन्नतीने सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

५. रेवया डोंगरे (IAS: २०२३): धाराशिव जिल्ह्यातील भूम येथे सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असलेले रेवया डोंगरे यांची बदली आता यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा येथे प्रकल्प अधिकारी (ITDP) आणि सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून करण्यात






# गुणवरे गावात 'डीजे'ला दिला फाटा, 'नाचून नाही तर वाचून' साजरी झाली भीमजयंती !

## बाईक रॅलीतून दिला सामाजिक संदेश : चिमुकल्यांचा सहभाग ठरला लक्षवेधी : 'जय भीम'च्या घोषणांनी परिसर दुमदुमला : केकसह फटाक्यांची आतषबाजी

**फलटण (दै. आरंभ पर्व)**

तालुक्यातील मौजे.गुणवरे येथील आढाव वस्ती परिसरात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती यंदाही अत्यंत विधायक मार्गाने साजरी करण्यात आली. 'नाचून नाही तर वाचून' हा नवा आदर्श समाजासमोर ठेवत, सर्व ग्रामस्थांनी एकत्र येत मिरवणुकीच्या खर्चाला फाटा दिला आणि महिलांसह भव्य बाईक रॅलीच्या माध्यमातून सामाजिक संदेश दिला. त्यामुळे प्रबोधन, सामाजिक ऐक्य आणि संविधानिक मूल्यांची जपणूक या त्रिसूत्रींवर साजरा झालेला हा जयंती उत्सव चर्चेचा विषय ठरत आहे. त्यामुळे दिखाव्यापेक्षा विचारांना, गोंगाटापेक्षा ज्ञानाला आणि खर्चापेक्षा संस्कारांना महत्त्व देणारा हा उपक्रम समाजासाठी दिशादर्शक आहे.




स्थानिक ग्रामपंचायत आणि पंचशील तरूण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या जयंती सोहळ्यात आढाव वस्ती ते गुणवरे या दरम्यान अतिशय शिस्तबद्ध आणि भव्य अशी डीजे-मुक्त बाईक रॅली काढण्यात आली. रॅलीच्या अग्रभागी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा आणि सहभागी सर्व भीम अनुयायांच्या हातामध्ये 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा', 'संविधान हा आपल्या अस्तित्वाचा आधार', 'तुमचं आमचं नातं काय? फुले, शाहू आंबेडकर हाय' यांसारखे घोषवाक्यांसह विविध सामाजिक संदेश देणारे बोर्ड व निळ्या ध्वजांनी सजलेली ही रॅली स्थानिक ग्रामस्थांसाठी आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरली. याप्रसंगी 'जय भीम'च्या घोषणांनी परिसर दुमदुमला होता. त्यामुळे संपूर्ण परिसरात नवचैतन्य निर्माण झाले होते. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या समता, न्याय आणि बंधुतेच्या मूल्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी करावी, याचे जिवंत उदाहरण म्हणजे ही जयंती असल्याचे म्हटले जात आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त होणाऱ्या मिरवणुकांमध्ये डीजे आणि अनावश्यक बाबींवर मोठा खर्च होतो. हा अनावश्यक खर्च टाळून त्यातून सामाजिक आणि विधायक कामाला हातभार लावावा, या उदात्त उद्देशाने स्थानिक भीम अनुयायांनी ही अनोखी परंपरा राबली आहे. यानिमित्ताने स्थानिक ग्रामपंचायतीत आयोजित अभिवादन सभेत अनेकांनी आपली मनोगते व्यक्त करून जयंती उपक्रमाचे कौतुक केले. याप्रसंगी गावातील लहान मुलांनी हातात 'शिक्षण हाच खरा विकासाचा मार्ग', 'संविधानाचे पालन करा' यांसारखे विविध प्रबोधनपर फलक घेत सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. त्यामुळे ही जयंती गावासाठीच नव्हे, तर परिसरासाठीही दिशादर्शक ठरली.

### ...तर मूल्ये रूजविणे हेच खरे अभिवादन!

**प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताचे संविधान तयार करून मानवतेचे मूलभूत अधिकार दिले. त्यांनी सामाजिक व आर्थिक समतेची मूल्ये रूजवली. तसेच स्त्री-पुरूष समानतेचा अधिकार प्रदान केला. संविधानातील या मूल्यांची प्रभावी अंमजबजावण तळागाळापर्यंत करणे, हेच बाबासाहेबांना खरे अभिवादन ठरेल, असे प्रतिपादन पंचायत समिती सदस्या वनिता आढाव यांनी केले.**

कार्यक्रमाची सुरुवात पंचायत समिती सदस्या वनिता आढाव आणि विविध मान्यवरांच्या शुभहस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज आणि महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. त्यानंतर पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी महामानवाच्या जीवनावर आधारित ओघवत्या भाषणातून उपस्थितांची मने जिंकली. दरम्यान, जयंतीचे औचित्य साधून पूर्वसंध्येला रात्री ठिक १२ केक कापला आणि फटाक्यांची आतषबाजी करत भीम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. या जयंती सोहळ्याला गावातील शिक्षक, ग्रामसेवक, सैनिक, विधिज्ञ, पोलीस कर्मचारी, मंत्रालयीन, रेल्वे व बँक सेवेतील कर्मचारी, उद्योजक, कृषी अधिकारी, प्रयोगशील शेतकरी, व्यावसायिक, पत्रकार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर आणि स्थानिक महिला, पुरूष, युवक, युवती, जेष्ठ नागरिक आणि भीम अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भीम जयंतीच्या निमित्ताने 'डीजे'वर हजारो रुपये खर्च करण्यापेक्षा, तो पैसा समाजातील गरजू मुलांच्या हातात पुस्तक देण्यासाठी वापरला पाहिजे. वाचनाने विचार प्रगल्भ होतात आणि शिक्षणाचाच समाज उन्नतीचा खरा मार्ग ठरतो. हा बाबासाहेबांचा विचार आहे. याच उपक्रमातून जगता आला पाहिजे, असा विधायक निर्णय विविध क्षेत्रांत यशस्वी ठरलेल्या स्थानिक सुशिक्षित मंडळींनी घेतला.

त्यामुळेच या वर्षी सर्वांच्या एकमताने डीजे-मुक्त, प्रबोधनपर बाईक रॅलीवर शिक्कामोर्तब झाले. नवी पिढी अधिक सुशिक्षित, सक्षम आणि जबाबदार अधिकारी व्हावी, हाच विचार या उपक्रमामागील मुख्य प्रेरणा असल्याचे आयोजकांनी आवर्जून सांगितले. त्यामुळे गुणवरेचा हा अनोख्या आणि दिशादर्शक उपक्रम जिल्हाभर कौतुकाचा विषय ठरत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### कुसूरला श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी निमित्त धार्मिक कार्यक्रम

**जुन्नर (आरंभ पर्व) : समर्थनगर-कुसूर (ता. जुन्नर) येथील श्री स्वामी समर्थ विसावा मंदिरात बुधवारी (ता. १५) श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी सोहळा विविध धार्मिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त अनेक स्वामी सेवकांनी श्री स्वामी चरित्र सारामृत सामुदायिक पारायण केले. यावेळी स्वामी भक्तांच्या वतीने विविध प्रकारच्या १५६ पदार्थांचा महानैवेद्य भोग अर्पण केल्याचे आयोजक तुकाराम महाराज दुराफे यांनी सांगितले. मंदिरात सकाळी भूपाळी आरती आणि ओम श्री स्वामी समर्थ जप तसेच श्री स्वामी समर्थ व दत्त मूर्तीस सामुदायिक अभिषेक आणि साईमाऊली पादुका पूजन करण्यात आले. मंदिरातील मूर्तींना चंदन लेप केला. त्यानंतर पालखी सोहळा आणि औदुंबर प्रदक्षिणा झाली. ह.भ.प. स्वप्निल महाराज दातखिळे यांचे प्रवचन झाले. दुपारी नैवेद्य आणि श्रींची महाआरती, महाप्रसादाचे आयोजन केले होते. मंदिरात विद्युत रोषणाई आणि फुलांची सजावट केली होती. रात्री श्रींच्या महाआरती व शेजारतीने सोहळ्याची सांगता झाली.**

### विवो T5 प्रो लॉन्च: 9020mAh बॅटरीसह पॉवरफुल स्मार्टफोन




**पुणे (आरंभ पर्व) : दीर्घकाळ टिकणारी बॅटरी, उच्च कार्यक्षमता आणि प्रगत फीचर्स यांवर लक्ष केंद्रित करत विवो इंडियाने त्यांच्या टी सिरीजमधील नवीन स्मार्टफोन Vivo T5 Pro 5G सादर केला आहे. 9020mAh क्षमतेची आतापर्यंतची सर्वात मोठी बॅटरी, शक्तिशाली प्रोसेसर आणि गेमिंग-केंद्रित तंत्रज्ञानामुळे हा स्मार्टफोन बाजारात नवा बेंचमार्क ठरण्याची शक्यता आहे. या स्मार्टफोनमध्ये स्नॅपड्रॅगन 7s Gen 4 प्रोसेसर देण्यात आला असून, तो सुमारे 1.2 दशलक्ष अँटूटू स्कोअरपर्यंत कार्यक्षमतेची हमी देतो. 120fps पर्यंत गेमिंग सपोर्टमुळे गेमिंगप्रेमींसाठी हा फोन विशेष आकर्षण ठरतो. यासोबतच 7000 चौरस मिमीची मोठी व्हेपर चेंबर कूलिंग सिस्टीम दिली असून, दीर्घकाळ वापरातही तापमान नियंत्रण प्रभावी राहते. Vivo T5 Pro ची 9020mAh बॅटरी चौथ्या पिढीच्या सिलिकॉन-कार्बन तंत्रज्ञानावर आधारित असून, दीर्घकाळ टिकणारी बॅटरी बॅकअप देते. 90W फ्लॅशचार्जमुळे अवघ्या 37 मिनिटांत 50% चार्जिंग होते. कंपनीनुसार, हा फोन 12.6 तास गेमिंग आणि 37 तास व्हिडिओ प्लेबॅक सहज देऊ शकतो. बॅटरी लाइफ एक्सटेंडर, ओव्हरनाइट चार्जिंग प्रोटेक्शन आणि बायपास चार्जिंगसारखी वैशिष्ट्येही यात आहेत.**



### पॉलिसीबझारकडून सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा सन्मान

**पुणे (आरंभ पर्व) : भारतातील सर्वात मोठ्या ऑनलाइन विमा प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या पॉलिसीबझारने, आपल्या 'आसियन रश' (ASEAN Rush) कार्यक्रमांतर्गत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सल्लागारांना ३९ लाख रुपयांच्या भेटवस्तू देऊन सन्मानित केले. आरोग्य, टर्म आणि बचत (देशांतर्गत आणि अनिवासी भारतीय) यांसारख्या विविध व्यावसायिक विभागांमधून निवडलेल्या एकूण ८९ सर्वोत्कृष्ट सल्लागारांना सन्मानित करण्यात आले. ही बक्षिसे वेगवेगळ्या स्तरांमध्ये विभागली गेली होती. सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सल्लागाराला मलेशियाची सर्व-खर्च-सहित सहल मिळाली, तर इतर विजेत्यांना बाईक्स, आयफोन, ॲप वॉचेस, स्मार्ट टीव्ही आणि ॲमेझॉन व्हाउचर्स यांसारख्या भेटवस्तू मिळाल्या. हा नवीनतम बदल पॉलिसीबझारच्या 'रिवॉर्ड्स अँड रिकग्निशन' (R&R) फ्रेमवर्कमधील एक धोरणात्मक बदल दर्शवतो, जो पारंपरिक रोख प्रोत्साहनांपासून उच्च-मूल्याच्या भेटवस्तू आणि आंतरराष्ट्रीय प्रवासाच्या अनुभवांवर लक्ष केंद्रित करण्याकडे वळत आहे. या यशानंतर, कंपनीने 'आसियान रश' कार्यक्रम सुरू केला आहे, ज्यामध्ये या वर्षीच्या विजेत्यांना मलेशियाची सर्व-खर्च-सहित सहल आणि इतर मौल्यवान भेटवस्तू मिळतील.**

## पिरामल फायनान्स लिमिटेडचा महाराष्ट्रात विस्तार

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

पिरामल फायनान्स लिमिटेड या रिटेल क्षेत्रावर लक्ष केंद्रित करणाऱ्या अग्रगण्य एनबीएफसी कंपनीने आपल्या प्रगतीत महत्त्वाचा टप्पा गाठत, एकूण व्यवस्थापनाखालील मालमत्तेत (एयूएम) 1 लाख कोटींचा आकडा पार केल्याची घोषणा केली आहे. हा टप्पा भारतातील प्रादेशिक आणि अर्ध-शहरी भागांमध्ये, विशेषतः महाराष्ट्रात, कंपनीची मजबूत वाढ आणि चांगली कामगिरी दर्शवतो. महाराष्ट्र हे पिरामल फायनान्स लिमिटेडसाठी सर्वात मोठ्या बाजारपेठांपैकी एक आहे. नाशिक, नागपूर, पुणे, ठाणे आणि कोल्हापूर यांसारख्या प्रमुख शहरांमध्ये कंपनीच्या 77 शाखा असून, मजबूत कर्ज व्यवसाय उभा राहिला आहे. राज्यात गृहकर्ज आणि व्यवसाय कर्जासाठी मागणी वाढत असून, नव्याने विकसित होत असलेल्या शहरांमुळे आणि छोट्या गावांमुळे या वाढीस चालना मिळत आहे. गेल्या चार वर्षांत पिरामल फायनान्सने आपले नेटवर्क मोठ्या प्रमाणात वाढवले आहे. आर्थिक वर्ष 2021 मध्ये 20 पेक्षा कमी शाखा असलेल्या कंपनीच्या आता 26 राज्यांतील 460 शहरांमध्ये 650 पेक्षा जास्त शाखा कार्यरत आहेत. ही वाढ मुख्यतः टियर 2 आणि टियर 3 शहरांमध्ये, तसेच महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये विस्तार केल्यामुळे झाली आहे. पुढील काही वर्षांत देशभरात 1,000 ठिकाणी विस्तार करण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे, ज्यामध्ये प्रादेशिक बाजारपेठांवर विशेष लक्ष दिले जाणार आहे.

## महापौर मंजुषा नागपुरे भीमगीतांच्या तालावर रंगल्या

### बोपोडीत जयंती महोत्सवात उत्साहाचा जल्लोष

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणे तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ.) छत्रपती शिवाजीनगर मतदारसंघ यांच्या संयुक्त विद्यमाने बोपोडी येथे भव्य जयंती महोत्सवाचे दिमाखदार आयोजन करण्यात आले.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या करण्यात आलेल्या या सोहळ्यात आकर्षक विद्युत रोषणाई, दमदार स्पीकर शो आणि भीमगीतांनी परिसर भारावून गेला. या उत्साहपूर्ण वातावरणात पुण्याच्या प्रथम नागरिक महापौर मंजुषा नागपुरे यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत भीमगीतांच्या तालावर ठेका धरला. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष रंगत प्राप्त झाली आणि नागरिकांमध्ये आनंदाची लहर पसरली. यावेळी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, डॉ. विजय खरे, अविनाश कदम, कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक व उपमहापौर परशुराम वाडेकर तसेच माजी उपमहापौर सुनीता वाडेकर आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी क्रेनच्या सहाय्याने तब्बल ३० फूट उंचीवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी उपस्थितांनी 'जय भीम'च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

याप्रसंगी बोलताना उमपहापौर परशुराम वाडेकर म्हणाले, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती तर्फे दरवर्षी संयुक्त जयंती महोत्सव मोठ्या दिमाखात विविध सांस्कृतिक, वैचारिक कार्यक्रमाच्या माध्यमातून साजरा केला जातो. यंदा बाबसाहेबांनी केलेलल्या महाड चवदार तळे सत्याग्रहाचे शताब्दी तर महात्मा फुले यांच्या जयंतीचे द्विशताब्दी वर्ष आहे. या निमित्ताने महापालिका विविध उपक्रम राबविणार आहे, महात्मा फुले पुणे महापालिकेचे सदस्य होते यामुळे याला विशेष महत्व आहे. या निमित्त होणाऱ्या कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदीजी येतील यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन वाडेकर यांनी मंत्री चंद्रकांत पाटील यांना केले.

संपूर्ण कार्यक्रमात शिस्तबद्ध नियोजन, आकर्षक सजावट आणि उत्साहपूर्ण सहभाग यामुळे बोपोडीतील जयंती महोत्सवाने एक वेगळाच आदर्श निर्माण केला.

## रेडमी ए७ प्रो ५जी लॉँच; ६.९ इंच डिस्प्ले, ६३००mAh बॅटरीसह दमदार फीचर्स

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शाओमी इंडियाने आपल्या रेडमी ए सिरीजमधील पहिला प्रो मॉडेल असलेला 'रेडमी ए७ प्रो ५जी' स्मार्टफोन अधिकृतपणे लॉँच केला आहे. परवडणाऱ्या किमतीत दमदार वैशिष्ट्ये देण्याचा दावा कंपनीने केला असून, दैनंदिन वापरासाठी सक्षम असा हा स्मार्टफोन ठरणार असल्याचे सांगितले आहे.



या स्मार्टफोनमध्ये सेगमेंटमधील सर्वात मोठा ६.९ इंच (१७.५३ सेमी) डिस्प्ले देण्यात आला असून १२० हर्ट्झ रिफ्रेश रेटमुळे स्मूथ अनुभव मिळतो. ८०० निट्स पीक ब्राइटनेस आणि वेट टच टेक्नॉलॉजीमुळे बाहेरील प्रकाशातही वापर सोपा होतो. तसेच, डोळ्यांच्या सुरक्षिततेसाठी टीयूव्ही प्रमाणपत्रासह डीसी डिमिंगची सुविधा देण्यात आली आहे.

बॅटरीच्या बाबतीतही हा स्मार्टफोन आघाडीवर असून ६३०० mAh क्षमतेची मोठी बॅटरी देण्यात आली आहे. १५ वॅट चार्जिंग आणि ७.५ वॅट रिव्हर्स चार्जिंग सपोर्टमुळे दीर्घकाळ वापर शक्य होतो. विशेष म्हणजे इतकी मोठी बॅटरी असूनही फोन सडपातळ डिझाइनमध्ये सादर करण्यात आला आहे. परफॉर्मन्ससाठी ऑक्टा-कोर ५जी प्रोसेसर देण्यात आला असून व्हर्च्युअल रॅम सपोर्टमुळे मल्टिटास्किंग अधिक वेगवान होते. या फोनमध्ये नवीन हायपरओएस ३.० प्रणालीचा समावेश करण्यात आला आहे, ज्यामुळे वापर अधिक सुलभ आणि स्मार्ट होतो.

फोटोग्राफीसाठी ३२ मेगापिक्सेल एआय ड्युअल रिअर कॅमेरा आणि ८ मेगापिक्सेल फ्रंट कॅमेरा देण्यात आला आहे. एआय स्काय आणि डॉक्युमेंट मोडसारख्या सुविधांमुळे छायाचित्रण अधिक आकर्षक बनते.

डिझाइनच्या दृष्टीने ८.१५ मिमी जाडी, साइड फिंगरप्रिंट सेन्सर, ३.५ मिमी हेडफोन जॅक, २०० टक्के व्हॉल्यूम बूस्ट स्पीकर आणि आयपी५२ रेटिंग यांसारखी वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत. तसेच, मायक्रोएसडी कार्डद्वारे २ टीबीपर्यंत स्टोरेज वाढवण्याची सुविधा उपलब्ध आहे. किंमत व उपलब्धता : रेडमी ए७ प्रो ५जी हा स्मार्टफोन ११,४९९ रुपयांच्या प्रारंभिक ऑफर किमतीत उपलब्ध होणार असून ॲमेझॉन, Mi.com आणि रिटेल स्टोअर्समध्ये विक्रीसाठी उपलब्ध असेल. ४GB+६४GB आणि ४GB+१२८GB अशा दोन प्रकारांमध्ये हा फोन ब्लॅक, मिस्ट ब्लू आणि सनसेट ऑरेंज रंगांत उपलब्ध असेल. विक्री १५ एप्रिलपासून सुरू झाली आहे.

## 'बॅटलग्राउंड सीझन २'चा झलकप्रदर्शन सोहळा

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

शरीरसामर्थ्य, डावपेच आणि मानसिक ताकदीची कठीण परीक्षा पाहणारा लोकप्रिय स्पर्धात्मक कार्यक्रम 'बॅटलग्राउंड' नव्या रूपात प्रेक्षकांसमोर येत आहे. पहिल्या पर्वाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर आता 'बॅटलग्राउंड सीझन २ चा झलकप्रदर्शन सोहळा पार पडला असून हा कार्यक्रम १७ एप्रिल २०२६ पासून अमेझॉन एमएक्स प्लेअरवर दररोज नव्या भागांसह विनामूल्य पाहता येणार आहे.




या पर्वात एकूण १६ स्पर्धक चार संघांमध्ये विभागले गेले आहेत. मुंबई स्ट्रायकर्स संघाचे नेतृत्व प्रियांका चाहर चौधरी, भोजपुरी भौकाल्सचे नेतृत्व खेसारी लाल, दिल्ली डॉमिनेटर्सचे नेतृत्व फुक्रा इन्सान, तर तेलुगू टायगर्सचे नेतृत्व कबड्डीपटू राहुल चौधरी करत आहेत. स्पर्धेचे मार्गदर्शक म्हणून क्रिकेटपटू शिखर धवन यांची भूमिका यंदाही महत्त्वाची ठरणार आहे.

'बॅटलग्राउंड हाऊस'मध्ये स्पर्धकांना शारीरिक तसेच मानसिक क्षमतेची कठीण चाचणी देणाऱ्या विविध आव्हानांचा सामना करावा लागणार आहे. दररोज होणाऱ्या कामगिरी चाचण्या आणि 'फाइट क्लब सप्ताहअंत'मधील थरारक स्पर्धांमधून अंतिम विजेत्यांची निवड होईल. अखेरीस एक पुरुष आणि एक महिला स्पर्धक 'भारताचा सर्वोत्तम तंदुरुस्ती तारा' हा किताब पटकावतील.

# 'निवडणूकजीवी' राजकारणामुळे देशाचे नुकसान

### सीमांकन घटनात्मक पद्धतीनेच व्हावे – काँग्रेसची प्रखर टीका : महिला आरक्षण, जातीय जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचनेवर केंद्र सरकारवर निशाणा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या धोरणांवर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने जोरदार टीका केली आहे. 'निवडणूकजीवी व सत्ताभिलाषी राजकारणा'मुळे देशाच्या लोकशाही व्यवस्थेला धक्का बसत असून, मतदारसंघांचे सीमांकन (Delimitation) घटनात्मक परंपरेनुसारच व्हावे, अशी ठाम भूमिका काँग्रेसने मांडली आहे.



महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी पत्रकार परिषदेत बोलताना 'नारी शक्ती वंदन' विधेयकासह केंद्राच्या विविध निर्णयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अपेक्षित केलेली सामाजिक समता व मागासवर्गीय महिलांचे प्रतिनिधित्व याकडे दुर्लक्ष करून केंद्र सरकारने महिला आरक्षणाचा विषय केवळ राजकीय फायद्यासाठी वापरला आहे. तिवारी म्हणाले की, पश्चिम बंगाल व तामिळनाडूतील निवडणुका डोळ्यासमोर ठेवून महिला मतदारांची सहानुभूती मिळवण्यासाठी केंद्र सरकारकडून घाईगडबडीत विधेयकांमध्ये बदल केले जात आहेत. "एकाच महिला आरक्षण विधेयकात पुन्हा बदल करून 'महिलांसाठी काम करत आहोत' असे दाखवण्याचा प्रयत्न हा निवडणूकजीवी राजकारणाचा भाग आहे," असा आरोप त्यांनी केला. २०२३ मध्ये संसदेत मंजूर झालेल्या 'नारी शक्ती वंदन' विधेयकानुसार लोकसभा व विधानसभांमध्ये ३३ टक्के महिला आरक्षण हे २०२९ नंतर आणि मतदारसंघांच्या पुनर्रचनेनंतर लागू होणार आहे. मात्र, यामध्ये वारंवार बदल करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.

"संविधानिक संकेत धुडकावून महिला आरक्षणाचा केवळ राजकीय फायदा घेतला जात आहे," असे तिवारी म्हणाले. महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय (OBC) घटकांना स्वतंत्र आरक्षण देणे आवश्यक असल्याचे काँग्रेसने स्पष्ट केले. यासाठी जातीनिहाय जनगणना आवश्यक असून, ती टाळण्याचा प्रयत्न केंद्र सरकार करत असल्याचा आरोपही करण्यात आला.

"बिहार व तेलंगणाने सहा महिन्यांत जातीय जनगणना पूर्ण केली, मग केंद्र सरकार का विलंब करत आहे?" असा सवाल तिवारी यांनी उपस्थित केला. लोकसभा व विधानसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेबाबत काँग्रेसने स्पष्ट भूमिका मांडली. "ही प्रक्रिया केवळ अंकगणितावर आधारित नसून राजकीयदृष्ट्या न्याय्य असावी. दक्षिणेकडील राज्यांनी लोकसंख्या नियंत्रण व साक्षरतेत चांगले काम केले आहे. त्यामुळे त्यांचे प्रतिनिधित्व कमी होऊ नये," अशी भूमिका काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी मांडल्याचे तिवारी यांनी सांगितले. एकंदरीत, महिला आरक्षण, जातीय जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचना या सर्व मुद्द्यांवर केंद्र सरकारवर काँग्रेसने तीव्र टीका करत, घटनात्मक परंपरा आणि सामाजिक न्याय यांना प्राधान्य देण्याची मागणी केली आहे.




दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२६






# समाजानं बुवाबाजी आणि अंधश्रद्धेतून बाहेर आलं पाहिजे



**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

**(दै. आरंभ पर्व)**

**आजच्या आधुनिक, विज्ञाननिष्ठ युगात आपण तंत्रज्ञानाच्या झपाट्याने प्रगती करत असलो, तरीही समाजाच्या एका मोठ्या घटकाला अजूनही बुवाबाजी आणि अंधश्रद्धेच्या दलदलीत अडकलेले पाहायला मिळते. ही बाब केवळ चिंताजनक नाही, तर समाजाच्या सर्वांगीण प्रगतीस अडथळा ठरणारी आहे.**

अंधश्रद्धा म्हणजे विचार न करता, कोणताही वैज्ञानिक आधार नसताना एखाद्या गोष्टीवर आंधळा विश्वास ठेवणे. या अंधविश्वासाचा गैरफायदा घेत काही तथाकथित 'बाबा', 'गुरू' किंवा 'भोंदूबाबा' लोकांच्या भीती, अज्ञान आणि अडचणींचा फायदा घेतात. आजार बरे करण्याचे, नोकरी लावण्याचे, संतानप्राप्ती घडवून आणण्याचे किंवा संकट दूर करण्याचे खोटे आश्वासन देऊन हे लोक सामान्य माणसांची फसवणूक करतात.

यामागे सर्वात मोठे कारण म्हणजे शिक्षणाचा अभाव आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाची कमतरता. अनेकदा अडचणीच्या प्रसंगी तर्कशुद्ध विचार करण्याऐवजी लोक झटपट उपाय शोधतात आणि अशा वेळी बुवाबाजीकडे वळतात. परंतु या मार्गाने समस्या सुटण्याऐवजी अधिक गुंतागुंतीच्या होतात. समाजात यामुळे केवळ आर्थिक फसवणूकच होत नाही, तर मानसिक आणि सामाजिक हानीही मोठ्या प्रमाणात होते. अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होतात, निरपराध लोकांना त्रास सहन करावा लागतो आणि काही वेळा तर जीवितहानीदेखील होते. हे सर्व थांबवण्यासाठी समाजाने सजग होणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी सर्वप्रथम शिक्षण आणि वैज्ञानिक दृष्टीकोन वाढवणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये आणि माध्यमांमधून विज्ञाननिष्ठ विचारसरणी रुजवली पाहिजे. तसेच शासनाने अंधश्रद्धाविरोधी कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्था आणि जागरूक नागरिकांनीही याविरोधात पुढाकार घेतला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीने स्वतः विचार करण्याची सवय लावली पाहिजे. "का?" आणि "कसे?" हे प्रश्न विचारण्याची वृत्ती विकसित झाली, तर अंधश्रद्धेला आपोआप आळा बसेल. श्रद्धा असावी, पण ती विवेकावर आधारित असावी; अंधश्रद्धा नव्हे. आज गरज आहे ती जागृतीची आणि परिवर्तनाची. समाजाने बुवाबाजीच्या जाळ्यातून बाहेर पडून विज्ञान, तर्क आणि वास्तवाचा स्वीकार केला, तरच खऱ्या अर्थाने प्रगती साधता येईल. अन्यथा, प्रगतीच्या नावाखाली आपण पुन्हा मागेच जात राहू. समाज बदलण्याची सुरुवात प्रत्येक व्यक्तीपासून होते. म्हणूनच, आजच ठरवूया. अंधश्रद्धेला नकार देऊ, विवेकाला स्वीकारू आणि एक प्रबुद्ध, सशक्त समाज घडवू.



## बापुराव चौधरी यांना पुरस्कार जाहीर

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्राची भूमीचे पत्रकार 'महा सुपरफास्ट न्यूज'चे उपसंपादक बापुराव चौधरी यांना उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल 'पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार २०२६' जाहीर करण्यात आला आहे. डॉ. मणिभाई देसाई प्रतिष्ठान, नीती आयोग, तसेच एमएसएमई मंत्रालय सलग्न संस्थांच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. बापुराव चौधरी यांनी राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक बांधीलकी आणि समाजसेवा या क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे. त्यांनी दीर्घकाळ निरलस भावनेने समाजोपयोगी कार्य करत राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश समाजात रुजविण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यास हातभार लागला असून ते आदर्शवत मानले जात आहे. अलीकडेच त्यांनी आपल्या कृतार्थ जीवनातील अनेक वर्षे पूर्ण केल्याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले आहे. त्यांच्या सेवाभावी वृत्तीचा आणि रचनात्मक कार्याचा गौरव व्हावा, या उद्देशाने हा पुरस्कार जाहीर करण्यात आल्याचे आयोजक डॉ. रवींद्र भोळे यांनी सांगितले.

हा पुरस्कार राष्ट्रभक्तीची प्रेरणा देणारा ठरेल, तसेच समाजात राष्ट्रसेवेची भावना वृद्धिंगत करण्यास हातभार लावेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. पुरस्कार वितरण समारंभ सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६ रोजी पुणे येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृह येथे होणार असून कार्यक्रमाचा सविस्तर तपशील लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. याप्रसंगी पत्रकार सचिन सुंबे, सुवर्णा कांचन, महंत गोपालव्यास कपाटे, सहदेव खंडागळे, सुनिल तुपे, खलिल शेख, हभप सुरेश कांचन, शिवराज साने सह विविध क्षेत्रातुन शुभेच्छांचा वर्षाव झाला.



## संघर्षातून यशाकडे प्रवास करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा गरजेची : मिलिंद पानसरे

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रम उत्साहात**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जीवनामध्ये संघर्ष करताना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा गरजेची आहे. त्यांची जिद्द व अफाट अभ्यास करून त्यांनी कमावलेल्या विविध पदव्या हे त्यांची महती आहे.

सर्व विद्यार्थ्यांनी त्यांना प्रेरणा म्हणून अभ्यास केल्यास यश निश्चित मिळेल असा विश्वास ज्येष्ठ पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते मिलिंद पानसरे यांनी व्यक्त केले. नू. म. वि. प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे-०२ येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ह्या कार्यक्रमासाठी मिलिंद पानसरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणातून डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांना शिक्षण, समता आणि संविधानाची जाणीव ठेवण्याचे आवाहन केले.

या प्रसंगी मुख्याध्यापक श्री. प्रकाश कांबळे, मुख्याध्यापिका सौ. अनुजा कांगणे (प्राथमिक विभाग), उपमुख्याध्यापिका संगीता काळे, शाळा समिती अध्यक्ष श्री. पराग ठाकूर, प्रसिद्ध चित्रकार वेताळ सर, सकाळचे पत्रकार निलेश चांदगुडे तसेच परिवेशिक उषा जांभळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात वा. दा. खरात यांनी बुद्धवंदनेने करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दशरथ राजगुरू यांनी उत्कृष्टरीत्या केले. त्यांच्या ओघवत्या शैलीमुळे कार्यक्रम अधिक रंगतदार झाला.

केंसकर सभागृह येथे सकाळी ९.०० वाजता झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. यावेळी उपस्थितांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### खडकवासल्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**खडकवासला (आरंभ पर्व) : खडकवासला गावामधील आर जे रणधीर सभागृह येथे भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव भारत रत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव यावेळी करण्यात आला व अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी माजी बांधकाम सभापती पुणे जिल्हा परिषद सुनिल भाऊ रणधीर, पै.राहुल मते, दिलीप मते, निलेश रणधीर, अक्षय कांबळे, सौरभ रणधीर उपस्थित होते.**

### एएमएसकडून पुणे जीसीसीचा विस्तार; भारत ठरतोय जागतिक टॅलेंट बॅकबोन

**पुणे (आरंभ पर्व) : जागतिक टॅलेंट ॲक्विझिशन आणि ऑर्केस्ट्रेशन सोल्यूशन्स क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी एएमएस (AMS) ने पुण्यातील आपल्या पहिल्या इंडिया-आधारित ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर (GCC) चा विस्तार जाहीर केला आहे. या विस्तारामुळे जागतिक पातळीवरील ऑपरेशन्समध्ये भारताची धोरणात्मक टॅलेंट बॅकबोन म्हणून असलेली भूमिका अधिक मजबूत झाली आहे. हा विस्तार एएमएसकडून ईएमईए (EMEA), एपीएसी (APAC), अमेरिका आणि यूके या आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमधील वाढत्या मागणीला प्रतिसाद म्हणून करण्यात येत आहे. कंपनी भारतातील आपल्या कार्यबलाचा विस्तार करत असून, जागतिक ग्राहकांना अधिक सक्षम आणि स्केलेबल सेवा देण्यावर भर देत आहे. भारत आज जगातील आघाडीचा जीसीसी हब म्हणून उदयास आला असून सध्या देशात १,७०० हून अधिक जीसीसी कार्यरत आहेत आणि २०३० पर्यंत ही संख्या सुमारे २,५०० पर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. केवळ खर्चिक फायद्यांपलीकडे जाऊन, संस्थांना भारतात विशेष कौशल्ये, डिजिटल क्षमता आणि स्केलेबल ग्लोबल सेवा मिळत असल्यामुळे भारताचे महत्त्व वाढत आहे. एएमएसचा पुण्यातील विस्तार हा या व्यापक प्रवाहाशी सुसंगत असून, कंपनीच्या जागतिक सेवा वितरण धोरणात भारताला केंद्रस्थानी ठेवतो.**

### शेतकरी न्यायासाठी युवक काँग्रेसचा सत्याग्रह



**पुणे (आरंभ पर्व) : भारत-अमेरिका कराराविरोधात महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसतर्फे करण्यात आलेल्या शेतकरी न्याय सत्याग्रहाला पुणे जिल्ह्यातील युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हा निर्णय भारतीय शेतकऱ्यांच्या अस्तित्वावर घाला असून, तो तात्काळ मागे घेतला गेला नाही, तर काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून अधिक तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा काँग्रेस कार्यकर्त्यांनी दिला.**



## नवदीप मित्र मंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त नऱ्हे मानाजी नगर येथील नवदीप मित्र मंडळाच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात सामाजिक एकात्मता, समता आणि शिक्षणाचे महत्त्व यावर उपस्थितांनी आपले विचार व्यक्त केले. बाबासाहेबांच्या विचारांचे अनुकरण करून समाजात सकारात्मक बदल घडविण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमाला पुणे महानगरपालिकेचे नऱ्हे पोलिस स्टेशनचे आसाराम शेटे, नगरसेवक हरिदास चरवड, नगरसेविका जयश्री भूमकर, नगरसेविका सौ.कोमल नवले, भाजप प्रभाग अध्यक्ष राजू कुटे,ज्येष्ठ पत्रकार मिलिंद पानसरे, 'सकाळ'चे पत्रकार निलेश चांदगुडे, विष्णू कदम, राज कदम, दशरथ राजगुरू यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन नवदीप मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले होते. परिसरातील नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून बाबासाहेबांना अभिवादन केले.

## निवारा बालगृहात शालेय साहित्य व भोजन वाटप

**बळीराजा कृषी सेवा केंद्र तर्फे अनोखा सामाजिक उपक्रम**



**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त निवारा बालगृह अनाथ आश्रम, मोहा फाटा (समता भूमी), ता. जामखेड येथे शालेय साहित्य व भोजन वाटपाचा उपक्रम उत्साहात पार पडला.

बळीराजा कृषी सेवा केंद्र, सारोळे व मित्र परिवार यांच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. संचालक औदुंबर सुरेश कापसे यांच्या संकल्पनेतून हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.



आंबेडकर यांच्या शिक्षणप्रेमी विचारांना अभिवादन करत गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात बालगृहातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याबरोबरच भोजनही देण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. कार्यक्रमास विपिन गाटे, सोमनाथ पाटील, अतुल देशपांडे, गणेश चौधरी, समाधान पाटील, गणेश वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच प्रकल्प अधीक्षक वैजनाथ केसकर, प्रकल्प संयोजक संतोष चव्हाण, प्रकल्प प्रतिनिधी सचिन घोटकर यांनीही सक्रिय सहभाग घेतला.

उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत समाजात अशा प्रकारच्या सामाजिक उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले. आंबेडकर जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.

# नऱ्हे-धायरी परिसरात ड्रेनेजकामांना सुरुवात

**आंबेडकर जयंतीनिमित्त विकासाला चालना : परिसरातील नागरिकांना दिलासा मिळणार**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून प्रभाग क्रमांक ३४ मधील नऱ्हे व धायरी परिसरातील विविध ठिकाणी महत्त्वाच्या मलनिस्सारण कामांचा शुभारंभ भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त करण्यात आला.



गेल्या तीन महिन्यांपासून सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे या कामांना प्रत्यक्ष सुरुवात करण्यात यश आले आहे. नऱ्हेगाव येथील स्मशानभूमी परिसरात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचत होते. काही ठिकाणी तीन फूटांपर्यंत पाणी साचल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. या समस्येच्या कायमस्वरूपी निवारणासाठी पावसाळी मलनिस्सारण वाहिनी टाकण्याचे काम सुरू करण्यात आले असून यामुळे भविष्यातील त्रास कमी होणार आहे. तसेच जेएसपीएम महाविद्यालय ते वेताळबाबा चौक या परिसरात मलनिस्सारण वाहिनी टाकण्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. मानाजी नगर परिसरात मुख्य वाहिनी टाकण्याच्या कामालाही प्रारंभ करण्यात आला असून या भागातील दीर्घकालीन समस्या दूर होण्यास मदत होणार आहे. याशिवाय धायरीतील बेनकर वस्ती परिसरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मलनिस्सारण समस्येच्या निराकरणासाठी मुख्य वाहिनी टाकण्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. या सर्व कामांसाठी प्रभागातील चारही नगरसेवकांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा, पत्रव्यवहार, प्रत्यक्ष पाहणी दौरे तसेच विकास आराखड्यानुसार नियोजन करण्यात आले. त्यामुळेच या कामांना गती मिळाली असून नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

शुभारंभ प्रसंगी नगरसेवक श्री. हरिदास चरवड, नगरसेवक श्री राजाभाऊ लायगुडे,नगरसेविका स्थायी समिती सदस्या सौ. जयश्री भूमकर, नगरसेविका सौ. कोमलताई नवले, मंडलाध्यक्ष श्री. यशवंत लायगुडे, सारंग नवले , श्री. बाजीराव कुटे, श्री. बाबासाहेब कुटे, माजी उपसरपंच श्री. सतीश कुटे, महिला मोर्चा शहर उपाध्यक्ष सौ.कोमल कुटे ,श्री. राजेंद्र कुटे, श्री. तेजस कुटे तसेच विविध ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने समाजहिताच्या कामांची सुरुवात करणे ही महत्त्वाची बाब असल्याचे मान्यवरांनी सांगितले. डॉ. आंबेडकर यांच्या समानता व समाजकल्याणाच्या विचारांना अभिवादन म्हणून या कामांचा शुभारंभ करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले. या कामासाठी सहकार्य केल्याबद्दल आमदार भिमराव तापकीर, तसेच पुणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांचे आभार व्यक्त करण्यात आले. नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी अशा विकासकामांना पुढेही प्राधान्य दिले जाईल, असा विश्वास उपस्थित लोकप्रतिनिधींनी यावेळी व्यक्त केला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### दौंड शहरामध्ये क्रांतीसुर्य महात्मा फुले जयंतीनिमित्त आरोग्य शिबिर संपन्न

दौंड (आरंभ पर्व) : दौंड शहरातील संविधान चौकामध्ये क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या 199 जयंतीनिमित्त डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया दौंड शहर तालुकाच्या वतीने सर्व रोग निदान आरोग्य शिबिर भरवण्यात आले होते या शिबिराचे  उद्घाटन माजी आमदार रमेश थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी या शिबिराला दौंड नगरपालिकेच्या नगराध्यक्ष दुर्गादेवी जगदाळे उपनगराध्यक्ष छायाताई थोरात, नगरसेवक जीवराज पवार, सचिन खरात,आधी सह अनेक मान्यवरांनी या शिबिराला भेट दिली, यावेळी 400 ते 500 लोकांनी या शिबिराचा लाभ घेतला अनेकांची मोफत शुगर तपासणी मोफत डोळे तपासणी मोफत चष्मे वाटप अधिक कार्यक्रम घेण्यात आले, या कार्यक्रमासाठी विषयी सहकार्य, डॉ. समीर कुलकर्णी, डॉ. प्रेम कुमार भट्टड, यांचे लाभले ,हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दौंड तालुका अध्यक्ष अशोक चव्हाण, दौंड शहर अध्यक्ष विकास शेलार, आतिश जंगले, श्रेयश सोनवणे, तम्मा पाळीम, आकाश लोखंडे, आदित्य सोनवणे, अर्जुन भंडारी, अभी जाधव, गणेश ससाने आदींनी प्रयत्न केले.



### बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराची देशाला गरज - सरपंच स्वातीताई पवार

दौंड (आरंभ पर्व) : दौंड तालुक्यातील आदर्श व तंटामुक्त गाव अशी ओळख असणाऱ्या गोपाळवाडी ग्रामपंचायत कार्यालयामध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची135 वी जयंती अति उत्साहामध्ये साजरी करण्यात आली, यावेळी सर्व महापुरुषांना सरपंच स्वातीताई पवार, पोलीस पाटील वर्षाताई लोणकर,  ग्रामपंचायत अधिकारी झुंबर होळकर,सोसायटीचे माजी चेअरमन बाळासाहेब गिरमे, भीमराव होले, शांताराम होले, माजी सरपंच विद्यमान सदस्य वैशाली ताई शिंदे, गोपाळवाडी गावचे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष राजेंद्र सोनवलकर, ग्रामपंचायत सदस्य प्रवीण होले, शरद होले, सुरज भुजबळ, विजुभाऊ लव्हे, बंटी शिंदे, आदींचे हस्ते महापुरुषांना पुष्पहार अर्पण करण्यात आला, यावेळी सरपंच स्वातीताई पवार म्हणाले की, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर  यांच्या विचाराची देशाला गरज असल्याची त्यांनी माहिती दिली, यावेळी बी वाय जगताप, हरिश्चंद्र गायकवाड सर, आदींनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेतला, यावेळी निलेश शेंडे, विठ्ठल होले, गौरव शिंदे, दत्ता माने, आधी यावेळी उपस्थित होते.

### एआय स्पेशलिस्ट आणि कंटेंट क्रिएटर पदांना मोठी मागणी

पुणे (आरंभ पर्व) : रोजगार बाजारपेठेत प्रवेश करणाऱ्या पदवीधर तरुणांसाठी एआय स्पेशलिस्ट, जनरेटिव्ह एआय इंजिनिअर आणि डिजिटल कंटेंट क्रिएटर ही पदे सर्वात वेगाने वाढणारी करिअर पर्याय ठरत असल्याचे लिंक्डइनच्या 'ग्रॅड्स गाइड २०२६' अहवालातून समोर आले आहे. बदलत्या रोजगाराच्या स्वरूपाशी जुळवून घेण्यासाठी मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने हा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला असून, यात भारतातील वेगाने वाढणारी पदे, उद्योग आणि नोकरीच्या संधींबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. अहवालानुसार, करिअरच्या सुरुवातीला असलेल्या तरुणांसाठी संधी केवळ तंत्रज्ञान क्षेत्रापुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. युटिलिटीज, शिक्षण, सरकारी प्रशासन, वाहतूक व लॉजिस्टिक आणि ऊर्जा तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांमध्येही मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होत आहे.

### दिलजीत आणि जान्हवी सोबत 'हाफटाइम' मोहीम लाँच




पुणे (आरंभ पर्व) : कोका-कोला इंडियाने 'हाफटाइम' या संकल्पनेवर आधारित नवी जाहिरात मोहीम लाँच केली असून, यासाठी लोकप्रिय कलाकार दिलजीत दोसांझ आणि जान्हवी कपूर यांच्यासोबत सहयोग केला आहे. दैनंदिन धावपळीच्या जीवनात छोट्या विश्रांतीच्या क्षणांना अर्थपूर्ण बनवण्याचा संदेश या मोहिमेतून देण्यात आला आहे. या मोहिमेचा गाभा असा आहे की, 'हाफटाइम' म्हणजे केवळ विश्रांती नव्हे, तर पुन्हा नव्या उर्जेने कामाला लागण्याचा क्षण आहे. कोका-कोलाच्या ताजेतवाने चवीद्वारे व्यक्तींना असा छोटा पण प्रभावी विरंगुळा मिळतो, जो त्यांना वर्तमानाशी जोडून ठेवतो आणि नात्यांना अधिक जवळ आणतो.कोका-कोला इंडिया आणि साऊथवेस्ट एशियाचे मार्केटिंग सीनियर डायरेक्टर कार्तिक सुब्रमण्यम यांनी सांगितले की, आजच्या वेगवान जीवनशैलीत लोकांना अर्थपूर्ण विश्रांतीची गरज अधिक भासते. अशा वेळी 'हाफटाइम'सारखा छोटा ब्रेक व्यक्तींना नव्याने उत्साही बनवतो आणि त्यांच्या सभोवतालच्या महत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष केंद्रित करण्यास मदत करतो.

### कॉग्निझंटकडून टेक्नोव्हर्स हॅकॅथॉन २०२६ची घोषणा

बंगळुरू (आरंभ पर्व) : कॉग्निझंटने (नॅसडॅक: CTSH) कॉग्निझंट टेक्नोव्हर्स हॅकाथॉन 2026ची घोषणा केली आहे. तिसऱ्या पर्वात प्रवेश करत असलेली ही स्पर्धा प्रादेशिक उपक्रमातून देशव्यापी व्यासपीठात रूपांतरित झाली असून, देशभरातील 400हून अधिक महाविद्यालयांमधील 20,000 पेक्षा जास्त प्री-फायनल वर्षातील अभियांत्रिकी विद्यार्थी यात सहभागी होणार आहेत. या माध्यमातून विद्यार्थी एकत्र येऊन सहयोग, नवकल्पना आणि एआय-आधारित समस्यांवर उपाय शोधण्याची आपली क्षमता सादर करतील.

# डॉ. आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय संविधानाचे शिल्पकार, समाजातील शोषित-वंचित घटकांचे तारणहार आणि समानतेचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती म्हणजे सामाजिक न्याय, समता आणि बंधुतेचा संदेश देणारा प्रेरणादायी दिवस आहे. असे प्रतिपादन पुणे जिल्हा भिमशक्ती संघटनेचे अध्यक्ष तथा राजगुरूनगर बँकेचे संचालक विजय डोळस यांनी येथे केले. राजगुरूनगर एसटी बसस्थानक येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती एसटी कर्मचाऱ्यांनी बसस्थानकावर उत्साहात साजरी केली. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपिठावर




आगारव्यवस्थापक उज्वला कुटे, स्थानक प्रमुख उत्तम लांडे, वाहतूक निरीक्षक नासिर हवालदार, सहायक वाहतूक निरीक्षक एम. एफ. सय्यद, भिमशक्ती संघटनेचे तालुकाध्यक्ष अनिल जाधव, रिपब्लिकन सेना पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष महेश शिवशरण, बसपाचे जिल्हा प्रभारी रमेश थोरात, राष्ट्रवादीच्या (शरद पवार गट) निता आल्हाट, जयंती उत्सव समिती अध्यक्ष मोहन गोपनारायण उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले, बाबासाहेबांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजातील अन्याय, विषमता आणि अस्पृश्यता यांच्याविरुद्ध लढण्यासाठी केला. त्यांनी समाजाला दिलेला सर्वात मोठा संदेश म्हणजे शिक्षण हेच खरे शस्त्र आहे. त्यांनी सांगितले की, जोपर्यंत आपण शिक्षित होत नाही, तोपर्यंत आपण आपल्या हक्कांसाठी उभे राहू शकत नाही. असेही ते म्हणाले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. सामुहीक बुद्धवंदना प्रार्थना करण्यात आली. याप्रसंगी अर्पिता आलट, विष्णू राठोड, प्रितेश किर्दक, अर्जुन वाघुले यांची भाषणे झाली

कार्यक्रमासाठी वरीष्ठ लिपीक स्नेहा कातोरे, क्रांती कांबळे, कैलास वाघमारे, अमित जगताप, राजेंद्र गुट्टे, अजिंक्य फलके, प्रशांत होले, विजय बुंदे, अविनाश आलट, रावसाहेब आडागळे, परशुराम साळवे, संतोष गायकवाड, रविंद्र राठोड आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजन एसटी कर्मचारी मोहन गोपनारायण, शिवाजी खलुले, राहुल पाटोळे आदी कर्मचाऱ्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली पाटील यांनी केले. तर आभार दत्ता गभाले यांनी मानले.

## कस्तुरी ग्रुपचा निर्धार उरुळी कांचन गाव होणार मोतिबिंदुमुक्त नागरिकांनी सहभाग नोंदवावा

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

कस्तुरी ग्रुपच्या वतीने उरुळी कांचन गाव मोतिबिंदुमुक्त करण्याचा महत्त्वपूर्ण संकल्प करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत दिनांक 15 एप्रिल 2026 ते 15 मे 2026 या कालावधीत सोमवार ते शनिवार, सकाळी 10 ते सायंकाळी 4 या वेळेत मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, महम्मदवाडी यांच्या सहकार्याने मोफत नेत्र चिकित्सा तपासणी तसेच मोतिबिंदु शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. गावातील गरजू व ज्येष्ठ नागरिकांसाठी हा उपक्रम मोठा दिलासा ठरणार आहे. ही मोफत तपासणी व शिबिर पुणे-सोलापूर




रोडवरील कस्तुरी एम्पायर येथे पार पडणार असून, गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. उरुळी कांचन गावातील प्रत्येक नागरिकाला निरोगी दृष्टी लाभावी आणि गाव मोतिबिंदुमुक्त व्हावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याची माहिती कस्तुरी ग्रुपचे अध्यक्ष मिलिंद मेमाणे यांनी दिली.

## ऑपरेशन हिमसेतू अंतर्गत पर्यटकांची केली सुटका

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय लष्कराने, बॉर्डर रोड्स ऑर्गनायझेशन (बीआरओ) आणि स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने, ऑपरेशन हिमसेतू अंतर्गत उत्तर सिक्कीममध्ये अडकलेल्या पर्यटकांना सुरक्षितपणे बाहेर काढले. तारामचूच्या पुढे भूस्खलनामुळे रस्त्याचा एक महत्त्वाचा भाग कोसळल्याने, चट्टनकडे जाणारा मार्ग बंद झाला आणि शेकडो पर्यटक अडकून पडले. त्यानंतर हे ऑपरेशन सुरू करण्यात आले. भारतीय लष्कराचे अभियंते—त्रिशक्ती सॅपर्स—तात्काळ कामाला लागले आणि त्यांनी रस्त्याची दुरुस्ती सुरू केली. या ऑपरेशनमधील एक महत्त्वाचे यश म्हणजे तुटलेल्या रस्त्यावर एका तात्पुरत्या पादचारी पुलाचे वेगाने



बांधकाम करणे, ज्यामुळे कठीण हवामान आणि भूभाग असूनही लोकांना सुरक्षितपणे बाहेर पडणे शक्य झाले. याव्यतिरिक्त, पथकांनी डोंक्याला पास येथील दाट बर्फ देखील हटवला, ज्यामुळे मार्ग खुला राहिला आणि बचावकार्य सुरू राहिले. सर्व पथकांमधील काळजीपूर्वक नियोजन आणि समन्वयामुळे, एकूण १,१७० पर्यटक आणि ७० मोटारसायकलींना कोणतीही इजा न होता सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. या मोहिमेने हे सिद्ध केले आहे की भारतीय लष्कर कठीण काळात लोकांना मदत करण्यासाठी नेहमीच तयार असते. भारतीय लष्कराच्या प्रवक्त्याने सांगितले, "ऑपरेशन हिमसेतू आमच्या 'सेवा प्रथम' या तत्त्वज्ञानाचे प्रदर्शन करते. आमचे सैनिक आणि अभियंते यांनी, बॉर्डर रोड ट्रान्सपोर्ट अँड हायवेज (बीआरओ) आणि प्रशासनाच्या सहकार्याने, प्रत्येक अडकलेल्या व्यक्तीला वाचवण्यासाठी वेगाने काम केले. आम्ही लोकांना मदत करण्यासाठी नेहमीच तयार असतो, विशेषतः उत्तर सिक्कीमसारख्या दुर्गम प्रदेशात." ऑपरेशन हिमसेतूचे यश हे सिद्ध करते की भारतीय लष्कर आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ मदत पुरवण्यास सक्षम आहे आणि ते लोकांचे एक विश्वासार्ह दल आहे.

## मराठी उद्योजकाचा अमेरिकेच्या हार्वर्डमध्ये झेंडा

### 'तौराल इंडिया' व भरत गीते यांची यशोगाथा हार्वर्ड बिझनेस स्कुलच्या अभ्यासक्रमात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अॅल्युमिनियम सँड कास्टिंग क्षेत्रातील आघाडीची कंपनी तौराल इंडिया आणि उद्योगांना ग्रामीण भारताशी जोडू पाहणारे उद्योजक, 'अॅल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया' अशी ओळख असलेले भरत गीते यांची यशोगाथा जगातील प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांपैकी एक असलेल्या अमेरिकेतील हार्वर्ड बिझनेस स्कूलच्या केस स्टडीमधून मांडण्यात आली आहे. या माध्यमातून तौराल इंडिया जागतिक स्तरावर अभ्यासल्या जाणाऱ्या निवडक कंपन्यांच्या यादीत स्थान मिळवणारी कंपनी ठरली आहे.

ही केस स्टडी तौरल इंडियाचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गीते यांच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या उच्च-प्रिसिजन अॅल्युमिनियम कास्टिंग व्यवसायाच्या प्रवासावर आधारित आहे. जर्मनीस्थित थोनी आलुटेक या कंपनीसोबतच्या संयुक्त उपक्रमातून २०१६ साली सुरू झालेल्या या प्रवासाचा मागोवा या अभ्यासात घेण्यात आला आहे. ऊर्जा, रेल्वे, संरक्षण आणि एरोस्पेस




यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांना सेवा देणाऱ्या जागतिक स्तरावरील उत्पादन व्यासपीठापर्यंत झालेल्या कंपनीच्या प्रगतीचा यात समावेश आहे.

हार्वर्ड बिझनेस स्कुल येथील वरिष्ठ प्राध्यापक व्ही. जी. नारायणन यांनी ही केस स्टडी तयार केली असून, मुंबईतील हॉटेल ताज लँड्स एन्ड येथे मंगळवारी त्यांनी या केस स्टडीचे सादरीकरण केले. भरत गीते व माजी उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्यासह उद्योग, शिक्षण व धोरणात्मक क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते. परंपरागत औद्योगिक पार्श्वभूमी किंवा नेटवर्क नसतानाही पहिल्या पिढीतील उद्योजक जागतिक स्तरावरील उद्योग कसा उभारू शकतात, याबाबतचे विश्लेषण प्रा. व्ही. जी. नारायणन यांनी यामधून मांडले आहे. प्रा. व्ही. जी. नारायणन म्हणाले, "तौरल इंडियाचा प्रवास उदयोन्मुख बाजारपेठेत उत्पादन क्षमता उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या घटकांवर केंद्रित आहे. जागतिक सहकार्य, उच्च तंत्रज्ञान आणि स्थानिक अंमलबजावणी यांच्या संगमातून सक्षम व जागतिक स्तरावर स्पर्धात्मक उद्योग कसा उभा राहू शकतो, याचे हे उदाहरण आहे.

## टक्केवारीवरून नगरसेविकांचा राडा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महापालिकेतील 'टक्केवारी'च्या मुद्द्यावरून आजी - माजी नगरसेविकांमध्ये राडा झाल्याच्या प्रकाराची सध्या सोशल मीडियावर जोरदार चर्चा रंगली आहे. सत्ताधारी भाजपच्या गोटातच टक्केवारीच्या या राड्यामुळे आता अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. बाणेर येथील आदिवासी विद्यार्थिनींसाठी उभारण्यात येणाऱ्या निवासी शिक्षण केंद्राच्या कामावरून विद्यमान आणि माजी नगरसेविकांमध्ये महापालिकेतच जोरदार वादावादी झाली.

## स्वायत्त, असामान्य आणि जागरूक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जेन अल्फा ही डिजिटलदृष्ट्या खोलवर जोडलेली पिढी आहे, जी भारताच्या लोकसंख्येच्या चतुर्थांशाहून अधिक भागाचे प्रतिनिधित्व करते. या पिढीतील 73% मुलांकडे आधीच वैयक्तिक स्मार्टफोनची उपलब्धता आहे आणि 60% मुले लॅपटॉपचा वापर करतात. ही अशी पिढी आहे ज्यांनी तंत्रज्ञानामध्ये स्वातंत्र्याचा अनुभव घेतला आहे. जेनरेशन अल्फाला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी, रुकम कॅपिटलने 'जेन अल्फा डिकोडेड: द कंझ्युमर-ब्रँड डायनॅमिक' हा अनोखा अहवाल सादर केला आहे, जो ते ग्राहक वर्तन आणि ब्रँड एंगेजमेंट कसे नव्याने परिभाषित करत आहेत हे स्पष्ट करतो.

अहवालाच्या प्रकाशनावेळी रुकम कॅपिटलच्या संस्थापक आणि मॅनेजिंग पार्टनर अर्चना जहागीरदार यांनी सांगितले: "जेन अल्फा ही भारतातील सर्वात तरुण पिढ्यांपैकी एक आहे, ज्यामध्ये घरगुती खरेदी निर्णयांपैकी 80% पर्यंत प्रभाव टाकण्याची क्षमता आहे. ते डिजिटलदृष्ट्या प्रवीण आहेत आणि कंटेंटपर्यंत अमर्याद प्रवेश आहे, तरीही अल्गोरिदम, मायक्रो-ट्रेंड्स, समवयस्क मान्यता आणि टिकाव व समावेशनासारख्या प्रारंभीच्या मूल्यांनी प्रभावित आहेत.









दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024  येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.